राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचा लाभ तसेच एपिएल-डिबीटी योजनेचा रोख लाभ मिळत नसलेल्या शेतकरी वर्गाला मोफत अन्नधान्य वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः अधापु-२०२६/प्र.क्र.५२ /ना.पु.२२
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २५ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :-

१) मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णय.

प्रस्तावना :-

केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या माहे ऑक्टोबर २०२६ च्या आकडेवारीनुसार, देशातील किरकोळ महागाई दर ६.०९% आणि अन्नधान्य महागाई दर ८.९४% इतका नोंदवला गेला आहे. तसेच, महाराष्ट्रातील सर्वसाधारण महागाई दर ५.८५% असून, ग्रामीण भागातील महागाई दर (६.८६%) हा शहरी भागातील महागाई दरापेक्षा (५.२०%) अधिक आहे. या वाढत्या महागाईचा फटका विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणावर बसत आहे.

त्यामुळे राज्यातील मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे हे तीन शहरी जिल्हे वगळून, उर्वरित **३३ जिल्ह्यांतील** राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अन्नधान्य अथवा एपिएल-डिबीटी योजनेच्या रोख लाभापासून वंचित शेतकरी कुटुंबातील सदस्यांना मोफत अन्नधान्य वितरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

शासन निर्णय :-

१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचा लाभ तसेच एपिएल-डिबीटी योजनेचा रोख लाभ मिळत नसलेल्या एकूण ३३ जिल्ह्यातील ४२,३०,७८३ शेतकऱ्यांना प्रतिमहा प्रतिव्यक्ती ५ किलो (३ किलो तांदूळ + २ किलो गहू) या प्रमाणात ३ महिन्यांकरीता मोफत अन्नधान्य वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) आधार सीडिंग पूर्ण झालेल्या शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस मशीनद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करून धान्य वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, उर्वरित लाभार्थ्यांचे आधार सीडिंग पूर्ण करून घेतल्यानंतरच त्यांना बायोमेट्रिक पडताळणीद्वारे अनुज्ञेय धान्य वितरित करण्यात येईल.

३) तीन महिन्यानंतरच्या कालावधीकरीता अन्नधान्य वाटप करण्याबाबतचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने घेण्यात येईल.

४) सदर मोफत अन्नधान्य वितरणाकरिता आवश्यक असणारे अतिरिक्त नियतन केंद्र शासनाच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाकडून मागणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर अतिरिक्त नियतन मंजुर करतेवेळी केंद्र शासनाद्वारे प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर अतिरिक्त नियतन मंजुर करतेवेळी केंद्र शासनाद्वारे प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार लागू होणाऱ्या पर्यायांतर्गत अन्नधान्य खरेदी व वितरणासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, खरेदी प्रक्रियेअंती होणारा प्रत्यक्ष खर्च आणि लाभार्थ्यांच्या संख्येतील बदलामुळे खर्चात होणारी संभाव्य वाढ/घट यासदेखील मान्यता देण्यात येत आहे.

७) सदर प्रयोजनासाठी उद्भवणाऱ्या खर्चास वित्त विभागाने निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) उपरोक्त नमुद खर्चाकरीता लेखाशिर्ष ४४०८००७७, मुंबई शहर - खरेदीची किंमत, २१ पुरवठा व सामग्री अंतर्गत वित्तीय वर्ष २०२६-२७ करीता रु.२३२२.१४ कोटी, तसेच अनुषंगीक खर्चाकरीता लेखाशिर्ष ४४०८ ०२६४ मुंबई शहर - खरेदीवरील अनुषंगीक खर्च ५० इतर खर्च अंतर्गत रू.६५.६६ कोटी असा एकूण रू.२३८७.८० कोटी इतका निधी उपलब्ध आहे. सदर बाबीसाठी होणारा खर्च सन २०२६-२०२७ च्या या मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

तसेच, सन २०२७-२८ या आगामी आर्थिक वर्षातील खर्च त्या वर्षासाठी मंजूर होणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) प्रकरणाची तातडी व वेळेची मर्यादा विचारात घेता इतिवृत्ताची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

सदर शासन निर्णय मा.मंत्रिमंडळाने दि.२५.११.२०२६ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेस तसेच वित्त विभागाने त्यांच्या ई-१९२६०१७, अनौपचारिक संदर्भ क्र.७६१/२०२६/व्यय-१०, दिनांक १६.११.२०२६, अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११२५१८४६४४८७०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH UMESHRAO GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=1D60828C41033AB1DA6D64EF17879745D578B334C05C1E8151EF933F134060BC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BC8833F9E213A7E4DFB9D2B071C9202EA52A04054E53B0C1BBF9E50C90A2CF5C, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2026.11.25 18:47:39 +05'30'

(संतोष गायकवाड)

शासनाचे उपसचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव.
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव.
५) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
९) मा. अध्यक्ष, राज्य अन्न आयोग, मुंबई.
१०) सर्व मंत्रालयीन विभाग.
११) सर्व विभागीय आयुक्त.
१२) सर्व जिल्हाधिकारी.
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
१४) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१५) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१६) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१७) सर्व उपायुक्त (पुरवठा).
१८) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
१९) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
२०) सर्व कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
२१) सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२२) सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई.
२५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
२६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२७) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
२८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परिक्षा मंडळ द्वारा - वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
३०) वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई.
३१) सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
३२) निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).